**ठळक बातम्या**

- विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्यमंत्रिमंडळाची मान्यता

- चालू खरीप हंगामात महाराष्ट्रासह चार राज्यांतल्या डाळी आणि तेलबियांच्या खरेदी योजनेला केंद्र सरकारची मंजुरी

- हवामान बदलाचा सामना करण्यासाठी भारत वचनबद्ध असून त्या दिशेने ठोस पावलं उचलत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित राष्ट्रीय नौवहन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं केंद्रीय बंदर विकास मंत्र्यांच्या हस्ते अनावरण

**आणि**

- ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांचं निधन/ मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली

**<><><><><>**

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यानुसार व्हीएमयू अर्थात विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्यात येणार आहे. नागरिकांकडून अभिप्राय मागवून त्यांचं कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण करून दस्त ऐवज तयार केलं जाईल. या अंतर्गत १६ संकल्पना आणि शंभर उपक्रम निश्चित केले जाणार आहेत.

याशिवाय मंत्रिमंडळानं आज सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चाला आणि राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्यानुसार अधिकचा निधी द्यायला, सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार करायला मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तसंच धुळे जिल्ह्यात शिरपूर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय स्थापनेलाही शासनाने मंजुरी दिली आहे.

**<><><><><>**

२०२५-२६च्या खरीप हंगामामध्ये महाराष्ट्र, तेलंगण, ओडिशा आणि मध्य प्रदेश या चार राज्यांतील डाळी आणि तेलबियांच्या, १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या खरेदी योजनेला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या अंतर्गत राज्यात सोयाबीनची १८ लाख ५० हजार ७०० मेट्रिक टन, उडदाची ३ लाख २५ हजार ६८० मेट्रिक टन, आणि मुगाची ३३ हजार मेट्रिक टन खरेदी केली जाणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल ही घोषणा केली. प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान; म्हणजेच पीएम-आशा अंतर्गत या योजनेला मंजुरी देण्यात आली. या संदर्भात चौहान यांनी काल राज्यांच्या कृषिमंत्र्यांबरोबर दूरस्थ माध्यमातून बैठक घेतली. शेतकऱ्यांचं उत्पन्न सुरक्षित ठेवण्याला केंद्र सरकारचं सर्वोच्च प्राधान्य आहे, असं शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असून त्या दिशेने ठोस पावलं उचलत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत आयएसए अर्थात आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या आठव्या अधिवेशनाला संबोधित करत होत्या. हवामान बदलाचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी तातडीने आणि ठोस पावलं उचलण्याची गरज असून त्यासाठी सूर्य हा सौर उर्जेचा शाश्वत स्रोत महत्त्वाचा असल्याचं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**होल्ड... बाईट - राष्ट्रपती**

अनेक देशवासीय आज छठपूजेच्या निमित्तानं सूर्याचं पूजन करत आहेत. याच काळात सुरू झालेलं हे अधिवेशन म्हणजे खऱ्या अर्थानं सौर उर्जेसाठीच्या जागतिक सहकार्याचं प्रतीक असल्याचं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले. चार दिवस चालणाऱ्या या संमेलनात १२४ देशातले विविध विभागांचे प्रतिनिधी आणि ४०हून अधिक देशांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. सौर उर्जा क्षेत्रात जागतिक समुदायातलं सहकार्य वाढवण्यासाठी तसंच उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौरऊर्जेच्या वापराला गती देण्यासाठी तसंच सर्वांना परवडणाऱ्या दरात सौरऊर्जा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं उपाययोजना करण्यासंदर्भात चर्चा होणार आहेत.

**<><><><><>**

सूर्यपूजेचा उत्सव म्हणून ओळखला जाणाऱ्या छठ उत्सवाचा आज सकाळी उगवत्या सूर्याला प्रार्थना करून, श्रद्धा, भक्ती आणि आनंदाच्या वातावरणात समारोप झाला. महिलांनी नद्या, तलाव आणि जलाशयांमध्ये उभे राहून सूर्यदेवाची प्रार्थना केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छठ पूजेत सहभागी झालेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

छठपूजा हा केवळ धार्मिक विधी नसून आपल्या आस्थेचे, संस्कृतीचे आणि परंपरेचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. संजय निरुपम आणि बिहारी फ्रंटतर्फे जुहू इथं झालेल्या छठपूजेच्या कार्यक्रमात ते आज बोलत होते.

**<><><><><>**

गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित असलेल्या राष्ट्रीय समुद्री नौवहन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन केंद्रीय बंदरं, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकच्या दुसऱ्या दिवशी झालं. भारताचा समुद्री नौकानयन क्षेत्रातला

हजारो वर्षांचा प्रवास हा फक्त भारताचा नसून सर्व खंडांमधला परस्पर आदर आणि भागीदारीचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. समुद्री नौकानयन वारसा दिनाचं उद्घाटनही सोनोवाल यांनी केलं. लोथलमधलं हे संकुल आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ होईल, तसंच समुद्री नौकानयन क्षेत्रात नवनिर्मिती करण्यासाठी नव्या पिढीला प्रोत्साहन देईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. भारताचा समुद्री नौकानयन इतिहास हजारो वर्षांचा असून तो जपायला मंत्रालय वचनबद्ध आहे, अशी ग्वाही बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांनी दिली.

**<><><><><>**

वसंतदादा सहकारी साखर कारखान्याच्या २००९ पासूनच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. ज्येष्ठ नेते शरद पवार या कारखान्याचे अध्यक्ष आहेत. ही समिती कारखान्याला राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या वापराची चौकशी करून २ महिन्याच्या आत सरकारला अहवाल सादर करेल. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसंच शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

**<><><><><>**

दहशतवाद विरोधी पथकानं काल पुण्याजवळ कोंढवा इथून जुबेर हंगरगेकर याला अल कायदा या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या तसंच समाजविघातक कारवायांमध्ये सहभागाच्या संशयावरून अटक केली. पथकाला मिळालेल्या खबरीच्या आधारे अधिकाऱ्यांनी  जुबेरच्या घरची झडती घेतली त्यावेळी काही आक्षेपार्ह दस्तऐवजही सापडले. न्यायालयानं त्याला ४ नोव्हेंबरपर्यंत एटीएस कोठडी दिली  असून त्याची चौकशी सुरु आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांचं काल रात्री मुंबईत निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात येतील.

सर्वार्थाने गाजलेल्या "वस्त्रहरण"चे नाटककार म्हणून गवाणकर ओळखले जातात. मालवणी बोलीभाषेला आणि लोकनाट्याच्या बाजाला मुख्य प्रवाहातल्या रंगभूमीवर मानाचं स्थान मिळवून देण्याचं श्रेय या नाटकाला जातं. या नाटकाचे ५ हजार ४०० हून जास्त प्रयोग झाले आहेत. मुंबईत सुरुवातीचे दिवस स्मशानभूमीत काढणारे गवाणकर यांनी महानगर टेलिफोन निगममधे नोकरी करता करता लेखनाचा छंद जोपासला. त्यांचं "वात्रट मेले" हे नाटकही प्रचंड लोकप्रिय ठरलं. "वर भेटू नका", "दोघी", "वनरुम किचन" ही नाटकं, "ऐसपैस" ही कादंबरी तसंच रविंद्रनाथ टागोरांच्या कथांचा अनुवाद - "चित्रांगदा" त्यांच्या नावे जमा आहेत. ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं.

गवाणकर यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. इतर अनेक मान्यवरांनी गंगाराम गवाणकर यांच्या पार्थिवाचं दर्शन घेऊन आदरांजली वाहिली**.**

**<><><><><>**

**नाशिक** जिल्ह्यात पावसामुळे ४८ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. जिल्ह्यातल्या ९०१ गावात एक लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना या अवकाळी पावसाचा फटका बसला आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात कापणीला आलेल्या भातशेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. किमान ६३ हेक्टर क्षेत्रावरची भातशेती पाण्याखाली गेल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तयार झालेल्या पिकाची पावसामुळे कापणी करता येत नाहीये. समुद्र खवळलेला असल्याने मासेमारीवरही परिणाम झाला आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्याच्या अनेक भागात पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे भात कापणी आणि मळणीचं काम विस्कळीत झाले आहे. तसंच कापलेले भात ओलसर होऊ नये म्हणून शेतकऱ्यांची धावपळ होतांना दिसत आहे.

**बंगालच्या** उपसागरात निर्माण झालेलं 'मोंथा' चक्रीवादळ आज अधिक तीव्र झालं असून ताशी ९० ते १०० किलोमीटर वेगाने ते आज मध्यरात्रीच्या सुमारास आंध्रप्रदेशच्या किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता आहे. लातूर आणि धाराशिव जिल्हे वगळता, सर्वत्र आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**